संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६०९४७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि/१३-विवि/**२४**/२०२२
दिनांक : ०३.०३.२०२२

प्रति,
मा.प्राचार्य/विभाग प्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/
पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे प्रशासकीय केंद्र,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

विषय : सत्र २०२१-२०२२ करीता विविध शुल्क विद्यापीठ खाती जमा करण्याबाबत..

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयामध्ये सत्र २०२१-२०२२ या शैक्षणिक सत्रामध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांकडून खालीलप्रमाणे शुल्क वसुल करण्यात येवून सदर शुल्क हे विद्यापीठास **वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ** यांचे नांवे काढलेल्या धनाकर्षाद्वारे किंवा धनादेशाद्वारे वित्त विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे जमा करावे व आपण विद्यार्थ्यांकडून वसुल करण्यात आलेली रक्कम विद्यापीठ खाती जमा केल्यानंतर जमा रकमेबाबतची पावती संचालक, विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे कार्यालयात पाठविण्यात यावी. यासंदर्भात आपणांस कळविण्यात आलेले आहे. परंतु अद्यापपर्यंत आपल्या महाविद्यालयाने सदर राशी विद्यापीठ खाती जमा केलेली नाही.

विद्यापीठ खाती जमा करावयाचे विद्यार्थी विकास शुल्क खालीलप्रमाणे

अ.क्र.	**विद्यार्थी शुल्कांचे शिर्ष**		**एकूण रक्कम रुपये**
१	विद्यार्थी परिषद कार्यक्रम निधी (विद्यार्थी परिषद शुल्क) प्रति विद्यार्थी		रु. ५/-
२	विद्यार्थी विकास निधी प्रति विद्यार्थी	व्यावसायीक महाविद्यालये	रु. २०/-
		अव्यावसायीक महाविद्यालये	रु. १०/-
३	विद्यार्थी सुरक्षा विमा निधी प्रति विद्यार्थी		रु. १०/-
४	आपत्कालीन निधी प्रति विद्यार्थी		रु. १०/-

आपणांस विनंती करण्यात येते की, उपरोक्तप्रमाणे विद्यार्थ्यांकडून वसुल करण्यात आलेले शुल्क त्वरीत विद्यापीठ खाती **दिनांक १५ मार्च, २०२२ पर्यंत** जमा करुन त्याबाबतची पावती संचालक, विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे कार्यालयात पाठविण्यात यावी. अन्यथा विद्यापीठ लेखासंहितेनुसार कार्यवाही करण्यात येईल, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

(डॉ. अविनाश असनारे)
प्रभारी संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रतिलिपी :
१) मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
२) कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
३) वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.